दिनांक  10/08/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.61

विषय- जिल्हा सह आयुक्त यांचे कडील आदेशानुसार विटा नगरपरिषदेचे वर्ग-4 मधील कार्यरत पात्र कर्मचारी  यांना सेवाजेष्ठतेनुसार वर्ग-3 मधील लिपिक या रिक्त पदावर पदोन्नतीने समितीने निवड केलेल्या कर्मचा-याची नेमणूक करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा मुख्याधिकारी यांनी आस्थापना प्रमुख याची मंजूर केलेली टिपणी
2) क्र.नपप्रसं/सांगली जि./पाटील/प.क्र.54/कक्ष-4/4176 दि.27/07/2023

विटा नगरपरिषदेच्या आस्थापनेवर मंजूर आकृतीबंधानुसार 'लिपिक' या पदाची 16 पदे मंजूर असून मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्र. संकीर्ण-2015/प्र.क्र.57/2015/विसू-1/ दिनांक 14 जानेवारी 2016 चे परिपत्रकानुसार सरळ सेवा भरती व पदोन्नतीने नियुक्तीसाठीचे प्रमाण 50:50 टक्के निश्चित केले आहे. त्यानुसार 8 पदे सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीने व 8 पदे अंतर्गत भरती / सरळसेवेद्वारे भरतीसाठी निश्चित केलेली आहेत मा. मागासवर्ग कक्ष पुणे यांचेकडील एस. आर. रजिस्टर क्र.999 दिनांक 08/02/2023 नुसार बिंदू नामावली तपासणी केलेली आहे. त्यानुसार "लिपिक" हे पद कार्यरत कर्मचा-यामधून सेवाजेष्ठतानुसार स्थायी निदेश 23 अ नुसार नगरपरिषदेने पदोन्नतीने भरण्याकरिता भरतीची प्रक्रिया दि.13/04/2023 रोजी नोटीस बोर्डवर जाहीर प्रसिद्ध केली होती. सदर पदासाठी नगरपरिषद कर्मच्या-यामधून 8 अर्ज प्राप्त झालेले आहेत. पदोन्नती भरतीने 'लिपिक' पदावर नेमणुकीसाठी शैक्षणिक अर्हता शासनमान्य विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर उमेदवारास प्राधान्य व टंकलेखनाचे शासनमान्य संस्थेचे प्रमाणपत्र 30 श.प्र.मि. मराठी, 40 श.प्र.मि. इंग्रजी, एम.एस. सी. आय. टी. किंवा तत्सम प्रमाणपत्र, मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान, न.प. सेवेत आल्यानंतर संचालनालयाने विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक, विभागीय परीक्षा विहित केली गेली नसल्यास एल. जी. एस. प्रमाणपत्र आवश्यक, एल. जी.एस ची शैक्षणिक पात्रता धारण करण्याची अट 45 वर्षाहून अधिक वय पूर्ण करणा-या कर्मचा-याच्या बाबतीत शिथिल केली आहे. यानुसार नगरपरिषदेकडे प्राप्त झालेल्या अर्जानुसार "लिपिक" पदोन्नती भरतीकामीचा प्रस्ताव जिल्हा निवड समितीकडे सादर केला होता.

तरी जिल्हा पदोन्नती निवड समितीने श्री.नारायण जयसिंग पाटील यांना वयाची 58 वर्षे पुर्ण झालेने वर्ग-4 मधून वर्ग-3 मधील लिपिक टंकलेखक या पदावर पदोन्नती मिळणेसाठी नेमणूक करणे उचित होईल अगर कसे याबाबत मा.जिल्हा सहआयुक्त यांनी क्र.नप/आरआर/कार्यालय-3/215/2023 दि.20/06/2023 चे पत्राने मा.आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई यांचेकडून मार्गदर्शन मागविणेत आले आहे.

पान नं.2 वर

त्यानुसार वरील संदर्भ क्र.2 नुसार मार्गदर्शन प्राप्त झाले असून त्यातील मुद्दा क्र.3 नुसार श्री.नारायण जयसिंग पाटील, यांचे वय 58 वर्षापेक्षा अधिक असलेने वर्ग-3 मधील लिपीक टंकलेखक या पदावर पदोन्नती देणे उचित होणार नाही असे नमूद केले आहे.

"लिपिक" पदोन्नती भरतीकामीच्या प्रस्तावास जिल्हा पदोन्नती निवड समितीने प्राप्त अर्जाची छाननी करून क्र.नवि/कार्या-03/पदोन्नती/209/2023 जिल्हाधिकारी कार्यालय सांगली दि.21/06/2023 चा आदेश प्राप्त झाला असून सदर आदेशास स्थायी निदेश क्र. 20 मधील 9 व 10 नुसार मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा